## २) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान : दूरदृष्टी

- राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाद्वारे (२००५ - १२) ग्रामीण जनतेला सर्वंकष व

परिणामकारक आरोग्यसेवा पुरविणे अपेक्षित आहे.

- या अभियानाच्या माध्यमातून एकूण राष्ट्रीय उत्पादनाच्या ०.९ टक्क्याऐवजी २ ते ३ टक्के खर्च आरोग्यासाठी होणे अपेक्षित आहे.
- आरोग्य व्यवस्थापनामध्ये काही मूलभूत बदल करणे व त्याद्वारे वाढीव अनुदानाचा योग्य विनियोग करणे या बाबीही या अभियानात अपेक्षित आहेत. आरोग्य सेवेच्या बळकटीकरणास पोषक अशा धोरणाचा पाठपुरावा करणे व आरोग्य सेवांचा दर्जा सुधारणेही या अभियानात अपेक्षित आहे.
- देशातील पारंपारिक उपचारपद्धतींना (AYUSH) प्रोत्साहन देणे व आरोग्यास पोषक अशा सामाजिक रूढींचे पुनरूज्जीवन करणे.
- आरोग्य व्यवस्थापनाचे विकेंद्रीकरण करणे.
- देशांतर्गत व राज्यांतर्गत विभागीय अनुशेष दूर करणे.
- निश्चित अशी उद्दिष्टे ठरविणे व झालेल्या

प्रगतिबाबत माहिती जाहीर करणे.

- ग्रामीण जनतेला विशेषतः स्त्रिया व मुले यांना परवडणारी आरोग्य सेवा सहजासहजी उपलब्ध करून देणे.

